**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## विद्यार्थिनी कल्याण मंडळ : महाभोंडला

### नवरात्र हा स्त्री सृजनशीलतेचा सन्मान

**राजगुरूनगर :** नवरात्र हा सर्जनाचा उत्सव असून स्त्रित्वाच्या सृजनशीलतेचा सन्मान असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय आणि साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात शारदीय नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आयोजित पारंपरिक महाभोंडला कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे यांच्यासह सर्व महिला प्राध्यापिका आणि मोठ्या संख्येने विद्यार्थिनी पारंपरिक वेशभूषेत उपस्थित होत्या. ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी आदिशक्तीच्या रूपातील स्त्रियांना सामाजिक समतेचा नैसर्गिक अधिकार मिळायला हवा अशी अपेक्षा व्यक्त केली.

दै.राष्ट्रसंचार



# नवरात्रोत्सव स्त्रीत्वाच्या सृजनशीलतेचा सन्मान : ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

नवरात्र हा सर्जनाचा उत्सव असून स्त्रित्वाच्या सृजनशीलतेचा सन्मान असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय आणि साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शारदीय नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने पारंपरिक महाभोंडला कार्यक्रमात बोलत होते.

या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, प्राचार्य डॉ.एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आदी विद्यार्थिनी पारंपरिक वेशभूषेत उपस्थित होत्या. ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी आदिशक्तीच्या रूपातील स्त्रियांना सामाजिक समतेचा नैसर्गिक अधिकार मिळायला हवा अशी अपेक्षा व्यक्त केली.

स्त्रियांच्या संदर्भात समाजात घडणाऱ्या घटनांचा निषेध करून त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाच्या दृष्टीने प्रशिक्षण देणार असल्याचे सांगितले. या वेळी विद्यार्थिनींनी ऐलमा पैलमा गणेश देवा, नदीच्या पलिकडे, काळी चंद्रकळा, एक लिंबू झेलू आदी पारंपरिक गीतांच्या तालावर ठेका धरला आणि दांडिया नृत्याचा आनंद लुटला. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष रतन टाटा यांच्या दुःखद निधनाबद्दल सर्वांनी शोक व्यक्त केला. सूत्रसंचालन डॉ.एस. एस. मांडे, प्रा. के.डी.शिंदे यांनी मानले. आभार समिती प्रमुख प्रा. वर्षा वाळुंज व डॉ. शिल्पा जगताप यांनी मानले.

दै. पुण्यनगरी



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेला महाभोंडला.

## नवरात्र हा सर्जनाचा उत्सव : ॲड. बुट्टे पाटील

**राजगुरुनगर :** नवरात्र हा सर्जनाचा उत्सव असून, स्त्रित्वाच्या सृजनशीलतेचा सन्मान असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालय आणि साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात शारदीय नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आयोजित महाभोंडला कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, प्राचार्य डॉ.एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे यांच्यासह महिला प्राध्यापिका, मोठ्या संख्येने विद्यार्थिनी पारंपरिक वेशभूषेत उपस्थित होत्या. ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी महिला संदर्भात समाजात घडणाऱ्या घटनांचा निषेध करून महाविद्यालयातील विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाच्या दृष्टीने प्रशिक्षण देणार असल्याचे सांगितले. या वेळी विद्यार्थिनींनी पारंपरिक गीतांच्या तालावर ठेका धरला. तसेच दांडिया नृत्याचा आनंद लुटला. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष रतन टाटा यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. सूत्रसंचालन डॉ.एस.एस. मांडे, प्रा. के.डी.शिंदे यांनी केले. आभार समिती प्रमुख प्रा. वर्षा वाळुंज व डॉ . शिल्पा जगताप यांनी मानले.

My Gramin Edition
Oct 11, 2024 Page No. 07
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख

HRM